Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

UGC Approved Monthly Journal

VOL-IV ISSUE-XII Dec. 2017

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शेती विषयक विचार

**सातलिंग काशिनाथ गौंड**
मुख्य लिपिक,
शिवजागृती महाविद्यालय,नळेगाव
ता.चाकूर जि. लातूर.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी नवीन आर्थिक विचार मांडले नसले तरी त्यांनी त्यांच्या शोधनिबंधातून, भाषणातून, वर्तमानपत्रातून स्वतंत्र मजूर पक्षाचा जाहीरनामा मांडला. तसेच आर्थिक बाबीवरील पुस्तकामधून डॉ. आंबेडकरांनी आपले आर्थिक सुधारणा व शेतीसंबंधी विचार मांडले आहेत.

भारतातील धारण क्षेत्राचे सरासरी आकारमान लहान असल्याने त्यातून निर्माण झालेले प्रश्न सोडविण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी उपाययोजना सांगितल्या आहेत.कोकणातील खोती पध्दत बंद करण्यात यावी.यासंबंधी मुंबई विधिमंडळात त्यांनी विधेयक मांडले. समाजवादाचा अपरिहार्य भाग म्हणून सामुदायिक शेतीसंबंधीचे विचार त्यांनी मांडले.त्यामुळे शेतीचा विकास होत गेलेला दिसून येतो. शेतीचा विकास कशा पध्दतीने पूर्ण करता येवू शकतो यासंबंधी त्यांनी विचारधारा सांगितली आहे.

**शेती संबंधीचे विचार :-**

डॉ. आंबेडकरांनी १९१८ मध्ये The Journal of Indian Economic Society च्या अंकामध्ये Small Holydays in Indian and Their remedies हा लेख लिहिला. या लेखामध्ये त्यांनी असे सांगितले की, शेती भारताचा सर्वात मोठा राष्ट्रीय उद्योग आहे. सर्व प्राथमिक व्यवसायामध्ये शेतीचे महत्व अधिक आहे. त्यांच्या मते भारतीय शेतीच्या उत्पादकतेवर परिणाम करणारा जर कोणता घटक असेल तर तो घटक म्हणजे शेत जमीनीचा आकार होय.

**भारतीय शेतीचा आकार :-**

भारतीय शेतीचा आकार विभाजनामुळे लहान झाला आहे. असे लहान-लहान तुकडे सगळीकडे विखुरलेली आहेत, म्हणून भारतीय शेतीची उत्पादकता कमी आहे.म्हणून डॉ. आंबेडकरांनी असा विचार मांडला की, विखुरलेल्या जमिनीचे एकत्रीकरण करुन त्याचा आकार वाढवून ती किफायतशीर करणे आवश्यक आहे. म्हणजे आर्थिक शेतीचा आकर, आर्थिक स्वरुपाचा असावा भविष्यात जमिनीचे तुकडे होणार नाहीत याची काळजी घेणेसुध्दा आवश्यक आहे. अशा प्रकारचे तुकडे होण्यासाठी हिंदू, मुस्लीमांमधील कायदे जबाबदार आहेत. त्यासाठी शेतीचा आकार किफायतशीर होत नसेल तर त्याला कोर्टाने परवानगी नाकारावी व तशी **'सिव्हिल प्रोसिजर कोड'** मध्ये सुधारणा व्हावी. अशी महत्वपूर्ण सूचना डॉ.आंबेडकरांनी त्यात केली आहे.

**शेतीसंबंधी पूरक साधनांचा वापर :-**

डॉ. आंबेडकरांनी जमिनीच्या आकाराबाबत दुसरा एक विचार मांडला. तो म्हणजे जमिनीचा एखादा तुकडा किफायतशीर आहे किंवा नाही, हे जमिनीच्या आकारावरुन न ठरविता शेतजमिनीवरील उत्पादन घटकाच्या प्रमाणावरुन ठरवावे.उत्पादन साधनाच्या आधारे जमिनीचा लहान आकार देखील किफायतशीर ठरु शकतो. या उलट जमिनीचा आकार मोठा असून त्यांच्या जोडीला उत्पादनाची साधने नसतील तर जमिनीचा

मोठा आकारदेखील किफायतशीर ठरु शकरणार नाही. त्यासाठी नांगरणी, पेरणी, कापणी, बि-बियाणे, किटकनाशके, पाणी यांचे प्रमाण वाढवावे लागेल. तरच भारतीय शेतीमध्ये उत्पादन वाढ होऊ शकेल असे डॉ. आंबेडकरांना वाटत होते.

**सामुदायिक शेतीचा पुरस्कार :-**

भारतामध्ये जमिनीची मालकी खाजगी स्वरुपाची आहे. भू-सुधारणा करताना मालकत्वाच्या बाबतीत जी सुधारणा व्हायला पाहिजे होती, ती झाली नसल्यामुळे भारतीय शेती मागासलेली राहिली आहे. म्हणून जमिनीच्या मालकीमध्ये सुधारणा झाली पाहिजे.

शेतक-यांनी सामुदायिक शेतीचा स्वीकार करावा असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. कारण सामुदायिक शेतीमध्ये जमिनीवर सरकाची मालकी असते. त्यामुळे जाती-धर्माचा विचार न करता जमीन ग्रामस्थांना दिली जाईल. त्यामुळे कोणावर अन्याय होणार नाही किंवा कोणाचे शोषण होणार नाही. लोकशाही तत्त्वावर आधारित असणारी ही शेती उत्पादन क्षमता व कार्यक्षमता कायम ठेवील व त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये परिवर्तन घडून येईल. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रतिपादन केले आहे.

**डॉ. आंबेडकरांचे भांडवलशाहीसंबंधी विचार :-**

समाजाची आर्थिक रचना प्रामुख्याने दोन प्रकारची आहे. एक म्हणजे भांडवलशाही व्यवस्था व दुसरी म्हणजे समाजवादी व्यवस्था. भांडवलशाही व्यवस्थेमध्ये भांडवलदार उघडपणे मजूर व शेतमजूर यांची पिळवणूक करीत आहेत. सामाजिक कामगार हा समाजातील शेतमजूर किंवा शेतमालक असू शकतो. तसेच त्याचा सामाजिक जीवनावर परिणाम होतो व त्यातून त्यांचे व्यक्तिगत जीवन न राहता ते गुलामगिरीचे जीवन होते.

**राज्य समाजवाद :-**

समाजवादी व्यवस्थेमध्ये देशातील साधनांवर सरकारची मालकी असते. त्यामुळे सरकार आपल्या सोईनुसार कर वसुली करते. उत्पादन घटकावरील अति किंवा विशिष्ट गोष्टीचे उत्पादन करण्यासाठी सरकार त्यावर निर्बंध लादू शकते. देशातील मुलभुत उद्योग व इतर उद्योगधंदे सरकार चालवू शकते. पण समाजवादामध्ये सरकारने पुढाकार घेऊन, जमिनीवर सरकाची मालकी असावी आणि सरकारने जातीचा किंवा पंथाचा कोणताच विचार न करता ती सर्वांना लागवडीसाठी द्यावी अशी भूमिका घेतली तर समाजात भूमिहीन मजूर व कूळ राहाणारच नाहीत.

**आर्थिक स्वरुपाचे विचार :-**

आर्थिक संबंधाचा अभ्यास न करता समाजाच्या कल्याणाचा देखील अभ्यास केला पाहिजे, तसेच देशातील संपत्तीचे विभाजनसुध्दा समाजामध्ये सारख्याच प्रमाणात विभाजित झाले पाहिजे. असे मत डॉ. बाबासाहेबांनी मांडले आहे.

भारताच्या आर्थिक विकासावर समाजातील अनेक पिढया व त्यांचे भविष्य आवलंबून असते. देशाचे कल्याण कसे साधता येईल या दृष्टीने अर्थशास्त्रीय विचार व्हायला पाहिजे. यासाठी पुढील गोष्टी महत्वाच्या आहेत.

१. भारतीय शेतीची प्रगती करणे.
२. देशातील भू-विकास बँका, खरेदी-विक्री, मंडळे, शेतकरी पतसंस्था यांनी शेती विकासाला मदत केली पाहिजे.

३. शेतीची उत्पादन क्षमता वाढविणे.
४. जमिनीचे विभाजन होण्याची प्रक्रिया रोखणे.
५. मुंबई प्रातांत जो कच्चा माल उत्पादित केला जातो, त्या कच्चा मालावर आधारित उद्योगधंदे सुरु केले पाहिजेत.
६. व्यावसायिक शिक्षणाचा विस्तार कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे.
७. लोकहित लक्षात घेवून आवश्यकतेनुसार उद्योगांची मालकी सरकारने स्वीकारणे.
८. औद्योगिक कामगारांसाठी कल्याणकारी योजना राबविल्या पाहिजेत.
९. समाजातील बेकारी कमी केली पाहिजे.
१०. सावकारी व्यवहारावर नियंत्रण ठेवले पाहिजे.
११. शेतकरी कुळांना संरक्षण दिले पाहिजे.
१२. शेती व बिगरशेती कामगारांना किमान वेतन देणे आवश्यक आहे.

**शेतीवर लावण्यात येणारा महसूल लवचिक असावा.** :-

डॉ. बाबासाहेब म्हणतात की, कराची आकारणी करीत असताना व्यक्तीचे उत्पन्न किती आहे. यापेक्षा त्या व्यक्तीची कर भरण्याची क्षमता किती आहे ? हे लक्षात घेतले पाहिजे. शेतीवर जो महसूल आकारला जातो तो लवचिक स्वरुपाचा असावा म्हणजे आवश्यकतेनुसार त्यात बदल करता आला पाहिजे.

**शेतमजूरासंबंधी विचार :-**

डॉ.आंबेडकरांनी शेतमजूराच्या उन्नतीसाठीदेखील काही सुधारणा सुचविल्या आहेत. त्यांच्या मते, औद्योगिक कामगारांना ज्या सवलती मिळतात, जे फायदे मिळतात ते शेतमजूरांनादेखील मिळाले पाहिजेत. जसे भविष्य निर्वाह निधी, आरोग्य विमा, अपघात विमा, नुकसान भरपाई इत्यादी स्वरुपाच्या सोयी मिळणे आवश्यक आहे.

भूमिहीन शेतमजूरांचा प्रश्न सोडवायचा असेल तर त्यांना केवळ जमिन सुधारणाविषयक कायदे करुन चालणार नाहीत तर भूमिहीन शेतमजुरांना जमिन मिळाली पाहिजे. तरच त्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा होईल. म्हणून देशामध्ये जी पडिक जमिन असेल ती सरकारने भूमिहिनांना द्यावी व आर्थिक समता निर्माण करण्याचे प्रयत्न करावेत.

**निष्कर्ष –**

१. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय शेतीचा विचार करताना तो सामाजिक समतेच्या दृष्टीने केला होता.
२. सामुहिक शेतीमुळे देशाचे उत्पन्न वाढेल व देश विकसित होईल असे बाबासाहेबांचे मत होते.
३. भारतीय शेतीवरील महसूल हा लवचिक स्वरुपाचा असावा असे बाबासाहेबांनी म्हटले आहे.
४. भारतीय शेतीचे उत्पन्न वाढवायचे असेल तर आधुनिक शेती साधनांचा उपयोग करणे आवश्यक आहे.
५. भारतातील भूमिहीन शेतमजूरांना सरकारने पडिक जमिनी द्याव्यात आणि त्यातून त्यांची आर्थिक सुधारणा करावी असे त्यांनी सांगितले आहे.

६. दारु व्यवसायातून जे उत्पन्न मिळेल त्याचा उपयोग सरकारने शेती सुधारणेसाठी व शिक्षणासाठी करावा असे डॉ.आंबेडकरांचे मत होते.

**संदर्भः-**

१. प्रा.पाटील अजित,अनाथांचा नाथ डॉ.आंबेडकर
२. इंगळे व.न.,असे घडले ज्ञानसूर्य डॉ. आंबेडकर
३. बागूल योगीराज, आठवणीतील बाबासाहेब.
४. डॉ. कसबे रावसाहेब, आंबेडकर आणि मार्क्सवाद
५. डॉ.निकुंभे सी.एस., आंबेडकरांचे सत्याग्रह आणि ब्रिटिश सरकार
६. भोळे भास्कर, डॉ.आंबेडकरांचा वैचारिक वारसा

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www.aiirjournal.com